**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना मायक्रोन्युट्रीयन्ट स्प्रिकल्स व प्रोटीन पावडर चा पुरवठा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एबावि-२०१५ /प्र.क्र.५६/का-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५**

**वाचा** :-१) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/३२९/२०१५, दि.१२/०२/२०१५

२)आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र.एबाविसेयो/का-२/२२४/२०१५, दि.३०/०१/२०१५

**शासन निर्णय** :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत २५ पैसे अंतर्गत उपलब्ध तरतूदीतून रु.१८,०२,६४,०३१/- इतक्या रक्कमेचे मायक्रोन्युट्रीयन्ट स्प्रिकंल्सचा पुरवठा करण्याबाबतचे प्रस्ताव वरील अ.क्र.१ येथील पत्रान्वये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्रचना या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने पोषण आहाराच्या दरात वाढ केल्यामुळे शिल्लक असलेल्या निधीतून ग्रामीण व नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रामधील लाभार्थ्यांना रु.२४,५५,१३,१७३/- इतक्या रक्कमेचे प्रोटीन पावडर चा पुरवठा करण्यासाठी संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये आयुक्तालयाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापि निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील **२५ पैसे अंतर्गत** उपलब्ध तरतूदीतून खालीलप्रमाणे पुरवठा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | विषय | दरकरार | दरकरारा वरील दर | कमाल रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | **प्रोटीन पावडर :** PVMSNo.012650Enteral Feed Powder Protein 85% short chain, Peptides 15%, Free Amino Acids, Fat 50%, MCT 25%, Vet Fat Carbohydrate Malto destri sachet of 126 gm Brand : ZENPRO-DS Speen : IP Life : 24 months | रक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.४९२१२/ DGAFMS/ DG-२F/ RC-Enternal Feed Powder/ २०१२-१३/५३१/१०४४, दि.०७/१२/ २०१२ अन्वये दरकरार झालेला असून सदर दरकरार दि.०६/१२/ २०१५ पर्यंत ग्राहय आहे. | रु.५८.११/- + ५% Vat Extra (प्रति १२६ ग्रॅम) | रु.९,०१,३२,०१५/- |
| २. | **स्प्रिकल्स -:** <u>Each Sachet Contains :</u> **Vitamin A** Concentrate (Powder Form) IP (As Acetate) EQ. to vit A 300 mcg coated vit. C EQ. to **Vit. C** IP 30 mg stabilized **Vit. D3** IP 5.0 mcg A- **Tocopherol** Acetate (as powder form) EQ. to A- Tocopherol Acetate IP | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (DMER) याचे पत्र क्र.DMER/ DPC/D&M/RC/ ०४/ ६११-६२५/२००९, दि.१७/६/२००९ अन्वये दरकरार झालेला आहे. सदर दरकरारास संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (DMER) याचे पत्र क्र. संवैशिवसं/औखक/ दरकरारास मुदतवाढ/७१७/ २०१२, | रु.५.८७/- (प्रति १ ग्रॅम) | रु.९,०१,३२,०१५/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 6.0 mg **Thiamine** Mononitrate IP 0.5 mg **Vit. B6** IP 0.5 mgStabilized **vit. B2** EQ. to Vit. B12 IP 0.9 mcg **Folic Acid** IP 160 mcg, **Nicotinamide** IP 6.0 mg Ferrous fumarate IP EQ. to **Iron** 12.5 mg **Zinc** Gluconate USP EQ. to Zinc 5.0 mg Cupric Oxide EQ. to **Copper** 0.3 mg, Potassium **Iodine** IP EQ. to Iodine 90.0 mcg | दि.०४/०८/२०१२ नुसार दरकाराची मुदत संपल्याच्या दिनांकापासून नवीन दरकरार होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. | | |
| | एकूण | | | रु.१८,०२,६४,०३०/- |

२. **यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

१) वरील वस्तूंचा मागणी व पुरवठा दरकरारपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे केला जाईल. तसंच दरकरारपत्रकास मुदतवाढ देण्याबाबतच्या अटींची पूर्तता काटेकोरपणे केली जाईल, याची दक्षता आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी घ्यावी.

२) सदरचा निधी शासनाच्या विहीत धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

३) पुरवठादाराने वरीलप्रमाणे वरील वस्तूंचा पुरवठा ग्रामीण /नागरी प्रकल्पस्तरापर्यंत करावा. प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यानी त्याच दिवशी पंचनामा करुन स्विकारावे व दुसऱ्या दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांना कळवावे. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात शासन पत्र क्र.विपताप्र-२०११/प्र.क्र.५३३/का-६, दि.१७/०७/२०१२ मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४) वरील वस्तूंचा पुरवठा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करून करण्यात यावा. पुरवठादाराने मागणी प्रमाणे विहीत प्रमाणात, विहीत केलेल्या गुणवत्तेनुसार वरील वस्तूंचा प्रकल्पस्तरापर्यंत पुरवठा केला आहे. याबाबतची खात्री करण्यात यावी. तसेच सदर पुरवठा केलेल्या बाबीवर आयसीडीएसच्या वापरासाठी/ शासनामार्फत पुरवठा असा शिक्का मारलेला किंवा लेबल लावलेला असावा. वरील वस्तूंचे वाटप / पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांची राहील.

५) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, या दृष्टीने स्वंयस्पष्ट माहिती अंगणवाडीतील नोंदवहीमध्ये उत्पादनाचा दिनांक / एकूण पुरवठा / एकूण उपयोग / मुदत बाहयतेचा दिनांक व शिल्लक याबाबतची योग्य नोंद टेवणे इ. बाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दयाव्यात.

६) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

७) " आपली अंगणवाडी " हया मासिकात सदर पुरवठयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

३. सदर खर्च " **<u>ग्रामीण / आंदिवासी प्रकल्पांसाठी</u>** :- **योजनेत्तर** -: मागणी क्र .एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०३ जिल्हा परिषदांना अनुदान (०३)(०१) एंकात्मिक बाल विकास सेवा योजना (मानधन व आहार खर्च) (२२३६००२७) १९ आहार खर्च, **योजनांतर्गत** -: मागणी क्र .एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (ग्रामीण १००% ) (०५) एकात्मिक बाल विकास सेवा

योजना(०५) (०२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६००६३) १९ आहार खर्च, **नागरी प्रकल्पांसाठी :- योजनेत्तर :-** मागणी क्र.एक्स-१,मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण,१०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम नागरी(०१) पोषण आहार कार्यक्रम (०१)(०१) पोषण आहार कार्यक्रम (२२३६०१८१)१९ आहार खर्च, **योजनांतर्गत :-** मागणी क्र.एक्स-१,मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०१)(०४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६०५४६) १९ आहार खर्च" या लेखशिर्षाखालील **सन २०१४-१५** या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. याकरीता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, परिपत्रक क्र.अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.०९/०२/२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SeemaDoke.

**( सी.श.डोके )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, (आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बा.क.), जिल्हा परिषदा.(आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,
सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (कार्यासन-५)